प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
Department of Communication, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

21 मे 2026

## भारतीय रिजर्व बँकेने एकेजी इन्फिन प्रायव्हेट लिमिटेड वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिजर्व बँकेने 18 मे 2026 रोजीच्या आदेशाद्वारे एकेजी इन्फिन प्रायव्हेट लिमिटेड (कंपनी) वर 'भागभांडवल किंवा नियंत्रणाचे संपादन' यावर दिलेल्या काही सूचनांचे पालन न केल्याबद्दल ₹1.80 लाख (केवळ एकलाख ऐंशी हजार रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. आरबीआई कायदा, 1934 च्या कलम 58जी(1)(बी) सह कलम 58बी(5)(एए) अंतर्गत प्रदान केलेल्या भारतीय रिजर्व बँकेमध्ये निहित अधिकारांचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

नवीन गुंतवणूकदारांकडून कंपनीच्या पेड-अप इक्विटी कॅपिटलच्या २६% पेक्षा जास्त शेअरहोल्डिंग / नियंत्रणाच्या अधिग्रहणासाठीच्या पूर्वलक्षी मंजुरीसंदर्भात आरबीआय आणि कंपनी यांच्यातील पत्रव्यवहारातून, आरबीआयच्या निर्देशांचे पालन न झाल्याचे उघड झाले. त्याच आधारावर, कंपनीला नोटीस बजावण्यात आली होती, ज्यामध्ये म्हटल्याप्रमाणे, वरील निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल बँकेला दंड का लावला जाऊ नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती. कंपनीने नोटिशीला दिलेले उत्तर आणि वैयक्तिक सुनावणी दरम्यान केलेले तोंडी सादरीकरण यांचा विचार केल्यानंतर, भारतीय रिजर्व बँकेला, आढळले की, कंपनीविरुद्ध पुढील आरोप कायम आहे, ज्यामुळे कंपनीवर आर्थिक दंड आकारला जाणे आवश्यक आहे.

कंपनीला तिच्या पेड-अप इक्विटी कॅपिटलच्या २६ टक्क्यांपेक्षा जास्त शेअरहोल्डिंगमध्ये बदल करण्यासाठी आरबीआयची पूर्व लेखी परवानगी मिळवण्यात अपयश आले होते.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे कंपनीने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. याशिवाय, हा आर्थिक दंड लादणे हे कंपनीच्या विरोधात आरबीआयने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईचा पूर्वग्रह न ठेवता आहे.

(ब्रिज राज)
मुख्य महाप्रबंधक

प्रेस प्रकाशनी: 2026-2027/304